# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक २३१ वा शुक्रवार दि.१६ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## आमदार अपात्रता प्रकरण राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांचीच : विधानसभा अध्यक्ष नार्वेकरांचा निर्वाळा

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ५३ पैकी ४१ आमदार हे अजित पवार गटाकडे होते. या गटाकडे असलेले बहुमत शरद पवार गटाने देखील नाकरालेले नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष अजित पवारांचाच आहे, असा निर्वाळा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज (दि. १५) आमदार अपात्रता प्रकरणाच्या सुनावणीवेळी दिला. तसेच अजित पवार व शरद पवार गटाचे सर्व आमदार पात्र ठरल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रता याचिकांवरील निकाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वे कर यांनी आज (दि.१५) दिला. निवडणूक आयोगाने अलीकडेच अजित पवार गटाला मूळ पक्ष ठरवत चिन्ह बहाल केले. त्यानंतर आमदार अपात्रतेविषयी निकाल देताना विधानसभा अध्यक्षांनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवारांचाच असल्याचे स्पष्ट करत शरद पवार गटाच्या तिन्ही याचिकाही त्यांनी फेटाळल्या.शरद पवारांच्या मनाविरोधात निर्णय घेणे म्हणजे पक्ष सोडणे नव्हे. पक्षांतर असहमती म्हणजे कायदेभंग नव्हे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. पक्षातील नाराजी म्हणजे विधिमंडळ पक्षाची नाराजी नाही, असेही नार्वेकर यांनी स्पष्ट केले. पक्षांतर बंदी कायद्यातील १० सूची म्हणजे पक्ष चालविण्याचे शस्त्र नाही. याचा उपयोग आमदारांना शिक्षा करण्यासाठी करु नये, असे निरीक्षणही नार्वेकरांनी नोंदवले. राष्ट्रवादीचा अध्यक्ष कोण हे ठरविण्याचा अधिकार माझा नाही प्रथम शरद पवार गटाच्या बाजूने सुनावणी झाली. यामध्ये अध्यक्ष नियमानुसार 'आपलाच' आहे, असा दावा राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाकडून करण्यात आला. त्या संदर्भातील पुरावेही सादर करण्यात आले. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष कोण हे ठरविण्याचा अधिकार माझा नाही, असे विधानसभा अध्यक्षांनी आपल्या निर्णयात म्हटले आहे. विधिमंडळात बहुमताच्या आधारावर पक्ष अजित पवारांचाविधिमंडळात पक्षाला बहुमत कुणाचे हा एकमेव निकषच महत्त्वाचा ठरतो. पक्ष कोणाचा हे ठरवताना तीन गोष्टींचा विचार केला जातो. पहिला सुप्रीम कोर्टाच्या आदेश , सचिवालयातील कागदपत्रे आणि विधानसभा अध्यक्षांसमोर सादर करण्यात आलेले पुराव्यांचा विचार केला जातो. पक्षाध्यक्ष ठरवताना पक्षाचा घटनेचा नाही तर बहुमताचा विचार होतो. आमदारांची भूमिका हा पक्षांतर्गत विषय आहे. विधिमंडळ बहुमताच्या आधारावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवारांचाच आहे, असे निरीक्षणही नार्वेकरांनी नोंदवले.३१ जानेवारीला संपले होते 'आमदार अपात्रता' सुनावणीचे कामकाज अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचा एक गट राज्यातील युती सरकारमध्ये सामील झाला. त्यानंतर राष्ट्रवादीत अजित पवार गट आणि शरद पवार गट एकमेकांसमोर आले. दोन्ही गटांकडून एकमेकांविरोधात आमदार अपात्रता याचिका दाखल केल्या होत्या. या याचिकांवर नार्वेकरांसमोर सुनावणी झाली. साक्ष नोंदणी, उलटतपासणी आणि अंतिम युक्तिवादानंतर ३१ जानेवारी रोजी सुनावणीचे कामकाज संपले. केंद्रीय निवडणूक आयोगाने अलीकडेच अजित पवार यांच्या



नेतृत्वाखालील पक्षच मूळ राष्ट्रवादी असल्याचा निकाल दिला होता. या पार्श्वभूमीवर विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहातून नार्वेकर काय निकाल देणार, याबाबत उत्सुकता होती. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस' अजित पवारांचीच असल्याचे नार्वे करांनी निकाल देताना म्हटले आहे.दरम्यान, शिवसेना आमदारांच्या अपात्रता सुनावणीत विधानसभा अध्यक्षांनी दोन्ही गटांच्या कोणत्याच आमदाराचे निलंबन केले नव्हते. एकनाथ शिंदेकडे पक्ष असल्याचा निर्वाळा नार्वेकरांनी दिला. मात्र, शिंदेंचे प्रतोद भरत गोगावले यांनी योग्य पद्धतीने व्हिप बजावला नसल्याचे सांगत ठाकरे गटाला निलंबित करण्याचे टाळले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या निकालात कोणालाही निलंबित न करण्याचे धोरण कायम ठेवले जाणार की वेगळा निर्णय होणार, याबाबत उत्सुकता आहे. राष्ट्रवादीच्या सुनावणीत व्हिपवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले नाही. त्यामुळे दोन्ही गटांच्या आमदारांवर टांगती तलवार असल्याचे सांगितले जात आहे.

## मुरुडचे मंडळ अधिकारी अनिल सूर्यवंशी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



लातूर लातूर तहसील कार्यालयातील पारदर्शक, कार्यतत्पर, मनमिळावू स्वभावाचे मुरुड विभागाचे मंडळ अधिकारी अनिल सूर्यवंशी यांचा वाढदिवस हरंगुळ मंडळ अधिकारी कार्यालयात मंडळ अधिकारी नागनाथ खंदाडे, बाबळगाव चे मंडळ अधिकारी सुनील लाडके, कन्हेरीचे मंडळ अधिकारी रफिक शेख यांनी वाढदिवसाचा केक कापून पुष्पगुच्छ देऊन अति उत्साहात वाढदिवस साजरा केला. यावेळी अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त, दिलीप गायकवाड, मधुकर आगलावे, अमोल सोळंके, रफिक पठाण, लक्ष्मण सूर्यवंशी, आदी उपस्थित होते.

## कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठी लातूर तहसील च्या वतीने १६ फेब्रुवारी रोजी विशेष कॅम्प

### लातूर तहसील कार्यालयाने कुणबी जात प्रमाणपत्र आत्तापर्यंत ३१८ वाटप केले.

लातूर :- लातूर तहसील कार्यालय भूमी अभिलेख विभागाच्या गाव नमुना ३३, ३४ मध्ये आढळून आलेल्या कुणबी जात नोंद नोंदीवरुन कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबद्दल चा विशेष कॅम्प दिनांक १६ फेब्रुवारी २०२४, शुक्रवार रोजी खालील गावाचे या ठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे, गावाची नावे, कासारगाव, खंडाळा, खुलगापूर, खुंटेफळ, कोळपा, ममदापूर, मांजरी, मुरुड अकोला, पिंपळगाव आंबा, पिंपरी आंबा, रामेश्वर, सावरगाव, एकुर्गा, हिसोरी, वाडी वाघोली या ग्रामस्थाने सदर नोंदी असलेल्या गावांच्या व्यक्तींच्या वारसाने प्रमाणपत्र काढण्यासाठी आवश्यक त्या पुराव्यासह तलाठी कार्यालय येथे आज उपस्थित रहावे असे आव्हान उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी रोहिणी नऱ्हे यांच्या मार्गदर्शनात लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## चुकीला माफी नाही : उध्दव ठाकरे

कोपरगाव/संगमनेर: चुकीला माफी असते, पण गुन्ह्याला नसते. सेनेच्या भगव्याला कलंक लावण्याचा प्रयत्न करणारा येथील गद्दार खासदाराने शिवसेना फोडणार्यात सामील होण्याचा गुन्हा केलाय. त्यामुळे त्यांच्या चुकीला माफी नाही, अशा शब्दात उबाठा सेनेचे प्रमुख उध्दव ठाकरे यांनी खासदार सदाशिव लोखंडे यांच्यावर पुन्हा निशाणा साधला. आता तर लोखंडेंना उमेदवारीच मिळणार नसल्याचा दावाही ठाकरे यांनी केला.

## भाजपपासून वेगळे व्हा अन्यथा बॉम्बने उडवून देऊ

पाटणा : बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हे पुन्हा एकदा विरोधकांची इंडिया आघाडी सोडून भाजपसोबत गेले आहेत. यापार्श्वभूमीवर त्यांच्या नावे धमकीचा मेसेज आला आहे. यात भाजपपासून वेगळे व्हा अन्यथा तुम्हाला बॉम्बने उडवून देऊ असे म्हटले आहे.बिहारचे पोलिस महासंचालकांना हा मेसेज आला आहे. हा मेसेज करणा-याला पोलिसांनी अटक केली आहे. ३० जानेवारी रोजी बिहारचे पोलिस महासंचालक आरएस भट्टी यांच्या व्हॉट्सअॅपवर मेसेज आणि ऑडिओ क्लीप आली होती. या मेसेजमध्ये म्हटले की जर मुख्यमंत्री नितीश कुमार भाजपपासून वेगळे झाले नाहीत तर इतर आमदारांसोबत त्यांना बॉम्बने उडवून देऊ, जस उत्तर प्रदेशात झाले होते. या धमकीची दखल राज्याच्या आर्थिक घोटाळा विभागाने घेतली आहे. या धमकीनंतर बिहारच्या आर्थिक घोटाळा विभागाने कर्नाटकात छापेमारी केली आणि धमकी देणा-या आरोपीला अटक केली. त्याच्याकडे चौकशी सुरु आहे. त्यानंतर आरोपील ताब्यात घेऊन पोलिस काल रात्री उशीरा पाटण्यात दाखल झाले.पोलिस महासंचालकांना ज्या फोन क्रमांकावरुन मेसेज आला त्याची चौकशी केली असता त्याचे लोकेशन कर्नाटकातील देवनगिरी जिल्ह्यात असल्याचे कळाले. त्यानंतर



पोलिसांची टीम तिथे पोहोचली आणि त्यांनी आरोपीला ताब्यात घेतले. आरोपाचे नाव सोनू असून तो बीएनएम हायटेक अॅग्रो इंडस्ट्रीज राइस मिलमध्ये पोती शिवायचे काम करतो. दरम्यान, चौकशीमध्ये त्याने सांगितले की, बिहारमधील वाढती बेरोजगारी आणि गरिबीला तिथले सरकारचे कारणीभूत आहे. त्याचे कुटुंब बिहारच्या हसनपूर इथल्या दयानगरमध्ये राहते. सोनूनं पुढे सांगितले की, धमकीच्या इतक्या क्लीप पाठवल्यानंतरही बिहारमध्ये कोणतीही हालचाल दिसून येत नसल्याने आपले या क्लीप्स माध्यमांना देणार होते. पण त्यापूर्वी त्याला ताब्यात घेण्यात आले.

## अखेर जरांगेंनी पाणी पिण्याचा निर्णय घेतला, या निर्णयानंतर उपोषण...



जरांगे पाटील हे सरसकट मराठा आरक्षणाच्या मागणीच्या पाठपुराव्याकरिता अंतरवाली सराटी येथे पुन्हा उपोषणास बसलेले आहेत. त्यांचा उपोषणाचा आजचा पाचवा दिवस आहे. अन्नत्याग करत उपोषण सुरु ठेवले आहे. यामुळे त्यांची प्रकृती खालावली आहे. मात्र आज (दि. १५) सायंकाळी समाज बांधवाच्या अग्रहास्तव एक ग्लास पाणी घेतले. मात्र उपोषण सुरुच ठेवणार असल्याच्या भुमिकेवर जरांगे-पाटील ठाम आहेत.समाज बांधवांकडून उपचार घेण्याचा आग्रह करत असताना दादा उपचार घ्या उपचार घ्या.. अशा घोषणा देण्यात येत होत्या. बय़ाचदा मनोज जरांगे यांनी उपस्थितांना सुनावले देखील होते. तुम्ही आग्रह करू नका, तुम्ही हट्ट करू नका, तुम्ही जितके हट्टी आहात तितकाच मी जिद्दी आहे, हे तुम्हालाही माहिती आहे असे म्हणत जरांगे पाटील आपल्या भुमिकेवर ठाम होते. हट्ट सोडा, मात्र समाज बांधव ऐकत नसल्याने अखेर मनोज जरांगे यांनी दोन घोट पाणी पितो पण उपचाराचा हट्ट करू नका असे सांगितले.

## आ. कराड यांच्या हस्ते मुरढव, पाथरवाडी व भंडारवाडी येथे ३ कोटीच्या विविध विकास कामाचे भूमिपूजन व लोकार्पण

लातूर : - केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागाच्या माध्यमातून मंजूर करण्यात आलेल्या ३ कोटी १५ लक्ष रुपये खर्चाच्या रेणापूर तालुक्यातील मौजे मुरढव, पाथरवाडी आणि भंडारवाडी येथील विविध विकास कामाचे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सोमवारी सायंकाळी भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. तिन्ही गावात विकास कामाच्या शुभारंभ निमित्ताने आमदार महोदयांचे वाजत गाजत जल्लोषाच्या वातावरणात जोरदार स्वागत करण्यात आले.

खरोळा जिल्हा परिषद मतदार संघातील मुरढव, पाथरवाडी आणि भंडारवाडी या तिन्ही गावातील सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागाच्या माध्यमातून आणि आमदार निधीतून भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी ३ कोटी १५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. त्यानुसार पाथरवाडी येथे हनुमान मंदिर सभागृह, खंडोबा मंदिर सभागृह, जलजीवन मिशन अंतर्गत विहीर आणि पाईपलाईन, गावातील अंतर्गत सिमेंट रस्ते, शेतरस्ते, सौर पथदिवे, घनसरगाव- चुकारवाडी रस्त्याचे काम भंडारवाडी येथे जिल्हा परिषद शाळेच्या दोन खोल्याचे बांधकाम, दलित वस्तीत सिमेंट रस्ता, गावअंतर्गत सिमेंट रस्ता, शेतरस्ते आणि मुरढव येथील ४८ लक्ष रुपये खर्चाचे शेत रस्ते आणि पांदण रस्ते त्याचबरोबर गावअंतर्गत पेव्हरब्लॉक रस्ता अशा विविध विकास कामाचा भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. तिन्ही गावातील ग्रामस्थांशी आ. कराड यांनी संवाद साधला.

तिन्ही गावातील कार्यक्रमास भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडधरले, तालुकाध्यक्ष अॅड. दशरथ सरवदे, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, शरद दरेकर, गणेश तुरुप, भाऊसाहेब गुळबिले, ओम चव्हाण, रमेश चव्हाण यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी मुरढव, पाथरवाडी आणि भंडारवाडी या तिन्ही गावातील मूलभूत गरजेच्या सोईसुविधा बरोबरच गावच्या सर्वांगीण विकासासाठी पैशाची कमतरता पडू देणार नाही असे आश्वासन दिलं. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच नरेंद्रजी मोदी यांनी गोरगरीब सर्वसामान्य माणसाला केंद्र बिंदू मानून अनेक योजना सुरू केल्या, केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ गरजूंना मोठ्या प्रमाणात मिळाला येणाऱ्या काळात पुन्हा एकदा नरेंद्र मोदीजींना देशाचे पंतप्रधान करण्यासाठी आपण



भाजपाला समर्थन आणि आशीर्वाद द्यावेत असे आवाहन केले.

मुरढव येथील कार्यक्रमास राजेंद्र गिरी महाराज, सरपंच लक्ष्मणराव यादव, उपसरपंच आकाश चव्हाण, दिलीप बरुरे, अजय शेळके, जयप्रकाश जटाळ, गोविंद मोटेगावकर, संजय जटाळ, गोविंद खरोळे, काका खानापुरे, बालाजी खरोळे, सचिन महांडुळे, बालाजी कांबळे, विजय मोटेगावकर, बाळासाहेब देशमुख, मुकुंद यादव, विठ्ठल जटाळ, काकासाहेब यादव, किशन वीर, भागवत मोटेगावकर, प्रशांत मोटेगावकर, हनुमंत चव्हाण. पाथरवाडी - चुकरवाडी येथील कार्यक्रमास सरपंच महेश सुडे, उपसरपंच व्यंकटेश येमले, अभिजीत मद्दे, राम बडे, माऊली खंदाडे, मनोहर पलमटे, निळकंठ जाधव, परीक्षित सुडे, किशन खंदाडे, सहदेव सुडे, श्याम जाधव, रमेश मद्दे, व्यंकटेश सुडे, नंदू भंडारे, लक्ष्मीकांत मद्दे तर भंडारवाडी येथील कार्यक्रमास सरपंच सावित्राताई शेळके, उपसरपंच अमर जाधव, अशोकराव दहिफळे, अनुरथ शिंदे, राम मामडगे, प्रकाश मामडगे, आबू गुणाले, उद्धव दहिफळे, सुग्रीव जाधव, श्रीधर दहिफळे, प्रभाकर गुणाले, विनायक जटाळ, दगडू शिंदे, प्रकाश जटाळ, वसंत कांबळे, चंदू गुनाले, महेश बरुळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुरढव येथे जेसीबी मधून फुलांचा वर्षाव करत आ. रमेशआप्पा कराड यांचे भव्य स्वरूपात नागरिकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. संपुर्ण मुरढव परिसर गजबजून गेला होता. मूरढव प्रमाणेच पाथरवाडी भंडारवाडी येथेही ग्रामस्थांनी मोठे वाजत गाजत स्वागत केले तिन्ही गावात सोहळ्याप्रसंगी पुरुष मंडळीं सोबतच महिलांनीही मोठी गर्दी केली होती.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# कतारमधील किमया कूटनीतीची

डॉ. शैलेंद्र देवळाणकर भारताने गेल्या काही वर्षांत परदेशात अडकलेल्या भारतीयांना संकटकाळात मायदेशी परत आणले. एवढेच नव्हे तर हेरगिरीसारख्या गंभीर आरोपांखाली अटकेत असलेल्या आणि ज्यांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली आहे, अशा व्यक्तींनाही सुखरूप मायदेशी आणले. भारताच्या बदललेल्या राजनयाचे आणि वाढत्या प्रभावाचे हे प्रतीक आहे.भारतीय नौदलाच्या निवृत्त आठ वरिष्ठ अधिकाऱ्यांना कतारच्या कनिष्ठ न्यायालयाने मृत्यूदंडाची शिक्षा सुनावल्याचे वृत्त गतवर्षी नोव्हेंबर महिन्यात आले आणि देशभर हळहळ व्यक्त झाली. भारताबरोबर पाच दशकांचे संबंध असणाऱ्या देशाने असे पाऊल उचलल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले.यानंतर भारत सरकारने तातडीने पावले टाकत या अधिकाऱ्यांच्या सुटकेसाठी धोरणात्मक प्रयत्न सुरू केले. नुकतेच हे आठही जण मायदेशी भारतात परतले आहेत. ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणामध्ये हस्तक्षेप केला नसता तर आमची सुटका होणे दुरापास्त होते'', अशी भावना या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. हा भारताच्या कूटनीतीचा आणि मुत्सद्देगिरीचा विजय आहे.परदेशांत अडकलेल्या नागरिकांना सोडवून आणणे, अशा प्रकारची 'रिस्क्यु ऑपरेशन' अमेरिकेच्या 'सीआयआय'सारख्या संस्थांकडून केली जात.परंतु भारताने गेल्या काही वर्षांत परदेशात अडकलेल्या भारतीयांना केवळ संकटकाळात मायदेशी परत आणलेले नाहीये; तर हेरगिरीसारख्या गंभीर आरोपांखाली अटकेत असलेल्या व्यक्तींनाही सुखरुप मायदेशी आणले. भारताच्या बदललेल्या राजनयाचे आणि वाढत्या प्रभावाचे हे प्रतीक. कतार हा राजेशाही पद्धतीने चालणारा इस्लामिक देश आहे. तिथे हेरगिरी हा अत्यंत गंभीर गुन्हा मानला जातो. साधारणपणे एक वर्षापूर्वी कतारच्या गुप्तहेर संस्थेने भारताच्या या निवृत्त नौदल अधिकाऱ्यांना अचानक ताब्यात घेतले होते.ते सर्व पाणबुडी विकसित करण्याच्या एका प्रकल्पामध्ये कार्यरत होते. या पाणबुडीची गुप्तमाहिती या अधिकाऱ्यांनी इस्त्राईलला पुरवल्याचे सांगत हेरगिरीचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आणि त्यांना तात्काळ अटक केली गेली.याबाबत भारताला कसलीही कल्पना देण्यात आली नाही. आरोप ठेवल्यानंतर त्यांना कायदेशीर साहाय्य, दूतावास कार्यालयाशी संपर्क यापेकी काहीही होऊ दिले गेले नाही. त्यानंतर अचानक तेथील कनिष्ठ न्यायालयाने त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली. शिक्षामाफीचा अधिकार वापरला पश्चिम आशियाचे एकंदर राजकारण पाहिल्यास तेथे इस्लामिक देश आणि इस्त्राईल असे ध्रुवीकरण परंपरागत चालत आलेले आहे. इस्त्राईल हा अरब राष्ट्रांचा प्रमुख शत्रूदेश म्हणून ओळखला जातो. अशा देशासाठी हेरगिरी केल्याचा आरोप कमालीचा गंभीर होता.त्याबद्दल मृत्यूदंडाची शिक्षा सुनावल्याचे वृत्त येताच भारताने तात्काळ हालचाली केल्या. दुबईमध्ये कॉप-२८ या परिषदेच्या वेळी पंतप्रधान मोदी आणि कतारचे अमीर शेख तमीम बिन हमाद अल थानी यांची भेट झाली. कतारचे राजे आमीर यांना वर्षभरात दोन वेळा गंभीर गुन्हेगारांची शिक्षा माफ करण्याचा अधिकार आहे. त्याच अधिकारांतर्गत या आठ माजी नौदल अधिकाऱ्यांची शिक्षा माफ करण्यात आली. कतार हा देश अलीकडील काळात दहशतवाद्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठिंबा देणारा देश म्हणून चर्चेत आहे. पाकिस्तानप्रमाणेच अनेक कुख्यात गुन्हेगारांचे 'कतार' हे आश्रयस्थान बनले आहे.'तालिबान' किंवा 'हमास' यांसारख्या अनेक देशांची मुख्यालये तेथे अफगाणिस्तानातील तालिबान सरकारला सत्तेवर बसवण्यापूर्वी ज्या चर्चा झाल्या होत्या त्या कतारची राजधानी दोहा येथे झाल्या होत्या. सौदी अरेबिया, संयुक्त अरब आमिराती (यूएई) यांसारख्या देशांनी आपली धोरणे बदलली असून, ते आता उदारमतवादाकडे झुकू लागले आहेत; परंतु कतार, तुर्कस्तान हे देश कट्टरतावादाकडे झुकताहेत. अशा देशामध्ये जेव्हा इस्त्राईलला मदत केल्याचा आरोप होतो, तेव्हा त्याला खूपच गंभीर रूप प्राप्त होते. त्यामुळे तेथून अशांची सुटका करणे म्हणजे सिंहाच्या जबड्यातून एखाद्याला सुखरूप बाहेर काढण्यासारखे आहे. हे कसे शक्य झाले?आखाती राष्ट्रांबरोबरचे संबंध सुधारण्यासाठी भारताने 'लूक वेस्ट' धोरणाचा अवलंब केला. भारत आता त्यांच्यासोबतचे केवळ आर्थिक आणि व्यापारी संबंध घनिष्ट करत नाहीये; तर अनेक इस्लामिक देशांना भारत संरक्षणदृष्ट्याही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत पुरवतो आहे. या प्रकरणात कतारसाठी काम करणारी कंपनी ही ओमानमधील होती.त्यांना नौदलाचे प्रशिक्षण देण्याचे काम या भारतीय अधिकाऱ्यांकडे होते. अशा प्रकारचे 'संरक्षण प्रशिक्षण' देण्याचे काम आता भारत करतो. इस्लामिक देशांवर लक्ष केंद्रित करण्यामागचे कारण म्हणजे भारत हा सर्वाधिक तेल आयात करणारा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे. आखातातील इस्लामिक देश भारतासाठी तेलाचा मुख्य स्त्रोत आहेत.नव्वद लाख भारतीय आखातात राहात आहेत. त्यांच्याकडून दरवर्षी ४० अब्ज डॉलर इतका 'फॉरेन रेमिटन्स' भारताला मिळतो. आखाती देश दीर्घकाळ आपल्या परराष्ट्र धोरणात दुर्लक्षित राहिले होते. परिणामी, पाकिस्तानच्या अपप्रचाराला हे देश बळी पडण्याचे प्रमाण वाढले होते.एकीकडे पाश्चात्त्य प्रसारमाध्यमे भारतात अल्पसंख्यांक मुस्लिमांवर अन्याय-अत्याचार होत असल्याची टीका करतात, दुसरीकडे इस्लामिक देश मात्र भारताचे कौतुक करत आहेत. संयुक्त अरब आमिराती(यूएई)सारख्या देशाबरोबरचा भारताचा व्यापार ९० अब्ज डॉलरवर पोहोचला आहे. 'यूएई'मध्ये जगातील सर्वांत मोठे हिंदू मंदिर उभारण्यात आले. इस्लामिक देशांच्या भारतातील गुंतवणुकीही वाढत आहेत. त्यांच्या अनेक योजनांत भारताला समाविष्ट करुन घेतले जात आहे. जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय घेतला तेव्हा ५३ इस्लामिक देशांपैकी दोन-तीन देश वगळता कोणीही भारताविरुद्ध बोलले नाही. भारताने केलेल्या राजकीय गुंतवणुकीमुळे हे शक्य झाले होते.युएईचे उदाहरण घेतल्यास २०१५ पासून २०२४ पर्यंत सात वेळा पंतप्रधान मोदी या देशाच्या भेटीवर जाऊन आले आहेत.

# शेतकरी आंदोलन पेटलं!

कृषि कायद्यांच्या विरोधात प्रदीर्घ आंदोलन करून मोदी सरकारला हादरवून टाकणा-या पंजाब, हरियाणासह उत्तर भारतातील शेतकरी आंदोलकांनी पुन्हा एकदा दिल्लीच्या दिशेने कूच केले आहे. संयुक्त किसान मोर्चा (बिगर राजकीय) आणि किसान मजदूर मोर्चाने या आंदोलनाची हाक दिली आहे. शेतक-यांच्या या आंदोलनामुळे पुन्हा एकदा सत्ताधा-यांना धडकी भरली आहे. आंदोलक शेतक-यांच्या प्रमुख मागण्यांपैकी एमएसपी ही महत्त्वाची आणि पहिली मागणी आहे. शेतक-यांकडून सरकार किमान हमी भावाने शेतमाल खरेदी करत असते. सरकारकडून होणारी ही खरेदी शेतक-यांसाठी उत्पन्नाचा खात्रीशीर मार्ग असतो. हा हमीभाव म्हणजे शेतक-यांसाठी आर्थिक सुरक्षेचे कवच असते. विशेषत: बाजारभाव घसरलेले असताना किमान हमी भावाचा शेतक-यांना आधार असतो. दिल्लीत २०२०-२१ साली झालेले आंदोलन मागे घेताना किमान हमी भाव ही प्रमुख अट होती. ही मागणी पूर्ण करण्याची शेतक-यांची मागणी आहे. लखीमपूर खेरीतील मृत शेतक-यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देण्यात यावी ही शेतक-यांची दुसरी मागणी आहे. ३ ऑक्टोबर २०२१ रोजी लखीमपूर खेरी येथे झालेल्या हिंसाचारासाठी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतक-यांनी केली आहे. लखीमपूर खेरी येथे चार आंदोलक शेतक-यांचा वाहनाच्या धडकेने मृत्यू झाला होता. या प्रकरणात केंद्रीय मंत्री अजय मिश्रा यांचा मुलगा आशिष याचा मुख्य सहभाग होता. २०२०-२१ मध्ये दीर्घकाळ चाललेल्या शेतकरी आंदोलनात सहभागी आंदोलकांवरील खटले मागे घ्यावेत व या आंदोलनात जीव गमावलेल्या शेतक-यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देण्यात यावी तसेच पीडित कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी देण्यात यावी अशी आंदोलकांची तिसरी मागणी आहे. २०१३ चा भूसंपादन कायदा पुन्हा लागू करा अशी मागणीही आंदोलकांनी केली आहे.विकास प्रकल्पांसाठी विविध प्राधिकरणांनी संपादित केलेल्या शेतजमिनीची भरपाई द्यावी व विकसित जमिनींवरील १० टक्के निवासी भूखंड संबंधित शेतक-यांच्या कुटुंबांसाठी राखीव ठेवण्याची शेतक-यांची मागणी आहे. भूसंपादनाच्या बदल्यात सध्या मिळणारा मोबदला अत्यल्प आणि अपुरा आहे. नोएडा प्राधिकरण, ग्रेटर नोएडा प्राधिकरण, यमुना प्राधिकरण यासारख्या प्राधिकरणांकडून शेतक-यांना मिळणारी भरपाई एकूण संपादित जमिनीच्या ५ ते ७ टक्के असते, ती अपुरी आहे. शिवाय मागील वर्षात कमी दराने जमीन संपादित केल्यामुळे त्याचे आर्थिक नुकसान झाल्यामुळे सरकारने भूसंपादन कायदा २०१३ आणावा अशी मागणी आहे. जागतिक व्यापार संघटनेतून माघार घेण्याची तसेच सर्व व्यापारी करार गोठवण्याची मागणीही शेतक-यांनी केली आहे. शेतक-यांनी ज्या मागण्या पुढे करत आंदोलन छेडले आहे त्या मागण्यांवर विचार करून निर्णय घेण्यासाठी आम्हाला वेळ लागेल असे केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा यांनी म्हटले आहे. त्यांच्या मागण्यांवर विविध घटकांशी चर्चा करावी लागेल. शेतक-यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. आम्हाला शेतक-यांच्या हिताची काळजी आहे.या मुद्यावर कोणी राजकारण करत असेल तर त्याची आम्हाला चिंता नाही असे मुंडा म्हणाले. आपल्या जुन्याच आणि आश्वासन देऊनही पूर्ण न झालेल्या मागण्यांच्या संबंधात केंद्र सरकारला जागे करण्यासाठी विविध शेतकरी संघटनांनी आंदोलन पुकारले असून दिल्लीच्या दिशेने निघालेल्या शेतक-यांना यावेळी हरियाणा सीमेवरच रोखण्यात आले. त्यांच्यावर पाण्याचे फवारे मारण्यात आले तसेच ड्रोनमधून अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून त्यांना पांगवण्याचा प्रयत्न करण्यात आला. या शेतक-यांना रोखण्यासाठी रस्त्यावर खिळ्याचे जाळे पसरवण्यात आले असून डम्पर आणि सिमेंटचे मोठे ब्लॉक उभारून हरियाणा सीमा सील करण्यात आली आहे. सुरक्षा जवानांचा बंदोबस्त इतका अभूतपूर्व आहे की, जणू काही सरकारने शेतक-यांच्या विरोधात युद्धच पुकारले आहे की काय असे वाटावे! आंदोलकांचे एक नेते पंढेरे म्हणाले,हा बंदोबस्त पाहिल्यानंतर पंजाब-हरियाणा या दोन राज्यांतील सीमा ही दोन देशांमधील आंतरराष्ट्रीय सीमा असल्यासारखे भासते आहे. यावरून असे दिसते की, हे सरकार राजकीय खेळ्या करण्यासंदर्भात अथवा आंदोलकांना दडपण्याच्या बाबतीत जितकी कार्यक्षमता आणि तत्परता दाखवत आहे तितकी कार्यक्षमता गत दहा वर्षांत त्यांनी राज्यकारभार चालवण्याच्या कामी लावली असती तर त्यातून काही लोकांचे निश्चितच भले झाले असते. ऐन लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर तरी सरकार शेतक-यांविषयी सहानुभूतीने विचार करताना दिसले असते तर ते पहायला लोकांनाही आवडले असते. यावेळी शेतक-यांनी ज्या मागण्या पुढे केल्या आहेत त्या नव्या नाहीत किंबहुना यातील बहुतांश मागण्या सरकारने मागच्या आंदोलनाच्या वेळीच मान्य केल्या आहेत. आता त्या अमलात आणा एवढेच शेतक-यांचे म्हणणे आहे.मागच्यावेळी स्वत: पंतप्रधानांनी शेतक-यांना किमान हमी भाव देण्याचे मान्य केले होते. त्याला कायद्याचे स्वरूप द्या आणि त्याची तातडीने अंमलबजावणी करा अशी शेतक-यांची मागणी आहे. तीन वादग्रस्त कायदे सरकारने याआधीच मागे घेण्याची घोषणा केली आहे. मात्र, इतक्या दिवसांनंतरही त्याची अधिसूचना जारी झालेली नाही. जर मुख्य मागणी मान्य आहे तर त्याची अधिसूचना जारी करायला काय अडचण आहे? सरकारच्या भाषेतच बोलायचे झाले तर, आंदोलनजीवी लोकांच्या कोणत्याही मागण्या मान्यच करायच्या नाहीत अशीच या सरकारची भूमिका दिसते. सरकारने गत दहा वर्षांत कोणत्याच आंदोलनाला भीक घातलेली नाही. उलट जे आपल्या विरोधात उठले आहेत त्यांची चोहोबाजूने गळचेपी करण्याचे त्यांचे धोरण राहिले आहे. हा उद्दामपणा नेमका कशाच्या जोरावर आला आहे? निवडणुकांच्या तोंडावर शेतक-यांचे आंदोलन चिघळले तर ते परवडेल का?




# कायदा स्वागतार्ह; पण

परीक्षांमध्ये होणा-या गैरप्रकारांना लगाम लावण्यासाठी केंद्र सरकारने आणलेले विधेयक स्वागतार्ह आहे; परंतु समाज अधिक समृद्ध व्हावा आणि चांगुलपणाच्या वाटेवर चालावा ही जबाबदारी असणा-या शिक्षणाच्या क्षेत्रात असा कायदा करावा लागणे हा आपला पराभव आहे. कायद्यामुळे जखम भरली जाईल हे जरी खरे मानले तरी ती कायमची बरी होईलच याची आज शाश्वती देणे अवघड आहे. शेवटी भीतीने फारतर बदल होईल पण परिवर्तनाची वाट चालणे शक्य नाही.देशभरात विविध स्तरांवर होणा-या परीक्षांमधील गैरप्रकारांवर निर्बंध आणण्यासाठी केंद्र सरकारने अखेर कायदा करण्याच्या दृष्टीने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. संसदेच्या कनिष्ठ सभागृहात संबंधित विधेयक मंजूर केले असून ते वरिष्ठ सभागृहात पाठवले जाईल. त्यानंतर राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर कायदा अस्तित्वात येईल. आज कायद्यात अत्यंत कडक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. त्याचे स्वागत करायला हवे. शिक्षण व्यवस्थेने व्यक्ती आणि समाजाचे मन घडवायचे असते. सद्सद्विवेकबद्धीचा विचार रुजवायचा असतो. समाज अधिक समृद्ध व्हावा आणि चांगुलपणाच्या वाटेवर चालत ही जबाबदारी शिक्षणाची असते.
आता त्याच शिक्षण व्यवस्थेतील गैरप्रकारावर निर्बंध आणण्यासाठी कायदा करण्याची वेळ येणे हाच मुळी शिक्षणाचा पराभव आहे. समाजात घडणारे जे काही वाईट असेल ते दूर करण्यासाठी शिक्षण संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे. शिक्षणातून विवेक आणि शहाणपणाची पेरणी करण्यात यश मिळाले असते तर कायदे करण्याची वेळच आली नसती. मात्र मानसिक परिवर्तनाची अपेक्षा असताना यश मिळत नाही म्हटल्यावर किमान कायद्याच्या धाकाने तरी यावर निर्बंध येतील अशी अपेक्षा आहे. कायद्यामुळे जखम भरली जाईल हे जरी खरे मानले तरी ती कायमची बरी होईलच याची आज शाश्वती देणे अवघड आहे. शेवटी भीतीने फारतर बदल होईल पण परिवर्तनाची वाट चालणे शक्य नाही. शिक्षणानेच अधिक मूल्याधिष्ठतेची वाट चालण्याची गरज अधोरेखित होते आहे.देशात गेल्या काही वर्षांत विविध विभागाच्या परीक्षांमध्ये गैरप्रकार घडत असल्याचे समोर आले आहे. ते घोटाळे घडत असताना संबंधित राज्यांनी कायद्याप्रमाणे कारवाई करण्यासाठी पावले टाकली असली तरी ते निर्बंध पुरेसे ठरत नसल्याचे चित्र आहे. अशावेळी आणखी कडक कायदे करून गैरप्रकाराला आळा घालण्याची गरज व्यक्त होऊ लागली होती. अर्थात परीक्षेतील गैरप्रकार हे केवळ कोणा एका राज्यात घडलेले नाहीत. ते अनेक राज्यांत समोर आले आहेत. आपल्याकडे इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी या स्तरावर अधिकाधिक मार्क मिळविण्याची प्रचंड मोठी स्पर्धा आहे.येथे मिळणा-या मार्कांवर विद्यार्थ्यांचे भविष्य घडत असते. त्यामुळे येथे मार्क मिळावेत म्हणून प्रयत्न केले जातात. मार्कांची स्पर्धा आणि पालकांची मानसिकता लक्षात घेत अनेकजण त्याचा लाभ उठवण्यासाठी परीक्षेत गैरप्रकार घडत असतात. मुळात शिक्षणाचे बाजारीकरण झाल्यानंतर हे दुष्परिणाम समोर आले आहेत. त्यामुळे यात गैरप्रवृत्तीचे लोक आर्थिकदृष्ट्या मालामाल होण्यासाठी देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात सापडत आहे याचा विचार करायला हवा. बाजारीकरणामुळे मूल्यव्यवस्था अधिक सैल होत चालली आहे. तिचा परिणाम म्हणून गेली काही वर्षे सर्वच स्तरांवरील परीक्षांमधील गैरप्रकारात वाढ होताना दिसत आहे. हे गैरप्रकार होत असताना त्याचे काहीच वाटेनासे झाले आहे हे अधिक दुर्दैवी आहे. परीक्षेतील गैरप्रकार कमी अधिक प्रमाणात सर्वच राज्यांत घडताना दिसत आहेत. शाळा-महाविद्यालय स्तरावर हे प्रकार जणू अनिवार्यच भाग झाला आहे. यास्तरावर कॉपीमुक्त परीक्षा यासाठी शपथ दिली जात आहे. त्यासाठी कायदे, नियम आहेत तरीपण मानसिक परिवर्तनासाठीचे मार्ग अनुसरले जात आहेत. येथील गैरप्रकाराला आळा बसविण्याबरोबर जरब बसवली गेली तर इतरत्र गैरप्रकार घडण्याची शक्यता नाही. देशातील सरकारी सेवेतील भरतीसाठी असलेल्या विविध परीक्षांमधील घोटाळ्यांचा विचार करता पंधरा राज्यांतील सुमारे ४१ प्रकारच्या विविध परीक्षांमध्ये गैरव्यवहार झाले असल्याची बाब समोर आली आहे. अर्थात या परीक्षांमधील गैरप्रकार जेव्हा समोर येतात तेव्हा त्याचे परिणाम अनेक तरुणांच्या आयुष्यावर होत असतात. या परीक्षांमधील गैरप्रकार जेव्हा समोर आले तेव्हा दीड कोटी तरुणांच्या आयुष्याला फटका बसला असल्याचे समोर आले. अर्थात परीक्षांमधील गैरप्रकार म्हणून मार्क वाढवणे, इतरांकडून पेपर लिहून घेणे, परीक्षांचे पेपर फोडणे यासारखे प्रकार घडत असले तरी अधिकाधिक गैरप्रकार हे प्रामुख्याने पेपर फोडण्याच्या संदर्भातील आहेत हेही लक्षात घ्यायला हवे. आपल्या राज्यात नुकत्याच तलाठी पेपर फुटीच्या संदर्भातील बातम्या प्रकाशित झाल्या आहेत. त्याचबरोबर शिक्षक पात्रता परीक्षेतील गैरप्रकारही समोर आले आहेत. मध्य प्रदेशमधील व्यापम घोटाळा तर गेली काही वर्षे चर्चेत आहे. आसाममध्ये पोलिस भरतीच्या परीक्षेतील घोटाळा उघड झाला होता.अर्थात गैरप्रकारांचा विचार करता यामागे वाढती बेकारी ही देखील कारणीभूत आहे. एखाद्या परीक्षेकरिता जेव्हा लाखो विद्यार्थी प्रविष्ठ होतात आणि जागा केवळ हजारात असतात तेव्हा त्याचा आर्थिक लाभ वाममार्गाने घेण्यासाठी काही मंडळी पुढे सरसावता हे लक्षात घ्यायला हवे. आसाममध्ये जेव्हा एक लाख चार हजार पदे भरण्याची जाहिरात सोडण्यात आली तेव्हा त्या जागांसाठी सुमारे एक कोटी पाच लाख उमेदवारांनी अर्ज सादर केले होते. गुजरातमधील अवघ्या सव्वापाच हजार जागांसाठी सुमारे साडेसोळा लाख, उत्तर प्रदेशातील अवघ्या तेहतीसशे जागांसाठी १९ लाखपेक्षा अधिक, उत्तराखंडातील १८०० जागांसाठी दोन लाख ३७ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले होते. राजस्थानमधील सुमारे ४० हजार सरकारी जागांसाठी ३८ लाख विद्यार्थी प्रयत्न करत होते. महाराष्ट्रातही कमी अधिक प्रमाणात तीच अवस्था आहे. राज्यात सुमारे साडेसहा हजार जागांसाठी सव्वा अकरा लाख विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले आहेत.काश्मीरसारख्या राज्यातही सुमारे दोन हजार तीनशे जागांसाठी सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज सादर केलेले होते हे आपण पाहतो आहोत. देशातील केंद्रीय लोकसेवा आयोगाकडील आकडेवारी किंवा विविध राज्यांमधील राज्य लोकसेवा आयोगामधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांसाठीच्या होणा-या नोंदणीचा आकडा लाखोंच्या घरात पोहोचला आहे. अशा बेकारीचा आलेख अधिकाधिक उंचावत असल्याने गैरप्रकार घडत असल्याचे चित्र समोर आले होते. स्पर्धा प्रचंड तीव्र आहे. त्यामुळे गैरप्रकार करून संधी मिळत असेल तर त्या वाटेने जाण्यासाठी प्रयत्न घडत आहेत. समाजातील बिघडत जाणा-या मानसिकतेचा लाभ उठवत अनेक जण या षडयंत्राचा भाग बनत आहेत. अगदी दहावी, बारावीचे पेपर फोडण्याचे प्रकार जेव्हा समोर येतात तेव्हा त्यामागे देखील पैसा मिळवणे या एकाच हेतूने काम घडत असल्याचे समोर आले आहे. या सर्व गैरप्रकाराला आळा घालण्याबरोबर अभ्यासू विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल व्हावे याकरिता कायद्याची मागणी केली जात होती. केंद्राने त्या दृष्टीने टाकलेले पाऊल महत्त्वाचे आहे. पण त्यापलीकडे समाजाच्या मानसिकतेतील बदल अधिक महत्त्वाचा ठरणार आहे.कायदा अधिक कडक करण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. त्यातील तरतुदी अधिक गंभीर आहेत हेही लक्षात घ्यायला हवे. विधेयकात म्हटले की, परीक्षेचे पेपर फोडणे किंवा उत्तरपत्रिकेत छेडछाड करण्यासारख्या प्रकारात दोषी आढळणा-यांना एक कोटी रुपये दंड आणि दहा वर्षेतुरुंगवासाची शिक्षा प्रस्तावित करण्यात आली आहे. या प्रकरणी दाखल होणारे गुन्हे हे अजामीनपात्र स्वरूपाचे असणार आहेत. त्याचवेळी अशा प्रकारात पोलिस स्वत:हून कारवाई करू शकतील. कोणत्याही वॉरंटशिवाय संशयितांना अटक करण्याचे अधिकार देखील पोलिसांना असणार आहेत. या कायद्याचा अत्यंत सकारात्मक परिणाम साधला जाईल अशी अपेक्षा करता येईल. शेवटी परीक्षेत जे जे काही गैरप्रकार घडत आहेत त्याचा परिणाम प्रामाणिकतेने अभ्यासाची वाट चालणा-यांच्या जीवनावर होत असतो. त्यांची मेहनत फळाला येत नाही. त्यातून त्यांच्या मनावर निराशेची छाया पडते. त्यातून ही मुले आत्महत्येसारखी पावले उचलताना. त्याचबरोबर अशा प्रकारचे प्रकार उघडकीस येतात तेव्हा परीक्षा घेणारी व्यवस्था, संस्था आणि सरकारबद्दल देखील अविश्वासाचे वातावरण निर्माण होत जाते. त्यामुळे अभ्यास करण्याच्या वृत्तीकडे देखील दुर्लक्ष होण्याची शक्यता अधिक निर्माण होते. त्याचा परिणाम एकूण समाजमनावर होत असतो.समाजातील एकूण गैरप्रकाराबद्दल चिंता करावी अशी परिस्थिती आहे. यावर कायद्याने आळा बसेल अशी अपेक्षा असली तरी त्यातून शंभर टक्के परिणाम साध्य होण्याची शक्यता नाही. आज देशात अनेक कायदे आहेत म्हणून गुन्हे कमी झाले असले तरी ते पूर्णत: थांबले आहेत असे घडलेले नाही. आपल्याला त्यासाठी शिक्षणातूनच मूल्याची विचारधारा रुजवण्याची गरज आहे. शिक्षण प्रक्रियेतून ज्ञानाची प्रतिष्ठा प्रस्थापित करण्याऐवजी आर्थिक सुबत्तेचा विचार अधिक रुजत आहे. त्या विचाराची पेरणी होणार नाही यासाठीच अधिक प्रयत्न व्हायला हवेत. कायद्याने जग बदलेल ही तर केवळ भाबडी अपेक्षा आहेअखेर समाजमन परिवर्तनाच्या दिशेने घेऊन गेल्याशिवाय गैरप्रकाराला आळा बसणे कठीणच आहे. त्यासाठी शिक्षण हाच एकमेव उपाय आहे, पण त्यातही सत्वहीनतेचीच पेरणी अधिक होते आहे म्हणून गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.



# समर्थ किड्स ग्रुपचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

मुरुड/महेंद्र आल्टे : मुरुड शहरातील माफक खर्चात, दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या समर्थ किड्स ग्रुपचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. ११/०२/२०२४ रोजी उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता विद्या मंदिर उच्च माध्यमिक विभागाचे माजी प्राचार्य श्री. गजेंद्र भोसले होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नसरीन पठाण उपस्थित होत्या. यावेळी श्रीमती देशमुख मॅडम, जनता विद्या मंदिरच्या माजी शिक्षिका श्रीमती चारूशीला भोसले, श्री.यशोजित भोसले यांची विशेष उपस्थिती होती. तर पालक प्रतिनिधी म्हणून प्रा. महेंद्र आल्टे, श्रीमती सारिका ढोकळे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ.नसरीन पठाण म्हणाल्या की, पालकांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. कारण आरोग्य सुदृढ असेल तरच मुले चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊ शकतात. चांगले आरोग्य हिच यशाची गुरुकिल्ली आहे. म्हणून दैनंदिन जीवनात पौष्टिक आहार घेणे सुद्धा तितकेच गरजेचे आहे.

पालक प्रतिनिधी म्हणून बोलताना प्रा. महेंद्र आल्टे म्हणाले की, समर्थ किड्स ग्रुप ही सर्वसामान्य मुलांना माफक खर्चात दर्जे दार शिक्षण मिळावे या उद्देशाने सुरू केलेली शाळा आहे. शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो हा सर्वांगिण विकास घडवून आणणारी शाळा आहे. पुढे ते म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासोबतच मानसिक विकास देखील होणे गरजेचे आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे, महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील, मामासाहेब जगदाळे, बाबासाहेब परांजपे, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या विचारांचा वसा आणि वारसा आपल्याला







मिळालेला आहे त्या विचारांवर मार्गक्रमण करणे काळाची गरज आहे.

अध्यक्षीय समारोप करताना माजी प्राचार्य श्री.गजेंद्र भोसले म्हणाले की, समर्थ किड्स ग्रुप ही गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा असून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच संस्कार देखील शाळेत दिले जातात. विद्यार्थ्यांच्या वयोगटाला अनुसरून वर्षभरात शाळेत विविध उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांच्या अंगी विविध कौशल्य निर्माण करण्यात येतात. तसेच शाळेत बहुविध बुद्धीमत्ता असलेली मुले असतात. प्रत्येक मुलाकडे कोणती ना कोणती बुद्धमत्ता असते. ही बुद्धीमत्ता ओळखून मुलांमध्ये बौद्धिक क्षमता वाढीसाठी प्रयत्न केले जातात. पुढे ते म्हणाले की, शिक्षणानेच मनुष्याच्या अंगी न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये विकसित होतात ही मूल्ये देखील विद्यार्थ्यांमध्ये वृद्धिंगत करण्याचे काम समर्थ किड्स ग्रुप करते.

दि. १०/०२/२०२४ रोजी शाळेमध्ये आनंदनगरी उपक्रम घेऊन पालकांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना आणि पालकांना बक्षीस वितरण देखील कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समर्थ किड्स ग्रुपच्या उपक्रमशील शिक्षिका श्रीमती संध्या भोसले यांनी केले तर आभार श्री. यशोजित भोसले यांनी मानले. आनंदाच्या आणि उत्साहाच्या वातावरणात स्नेहसंमेलन संपन्न झाले. स्नेहसंमेलनाला विद्यार्थ्यांची, पालकांची आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेजारी, मित्रपरिवार, हितचिंतक, पालक वर्ग, बालचमु आदींनी परिश्रम घेतले.

# कसं तयार होतं व्यसनाचं मॉडेल?




अमेरिकेतल्या फ्लोरिडा राज्यात १६ वर्षांखालच्या मुलांना सोशल मीडिया वापरण्यावर बंदी घालणारे विधेयक मंजूर करण्यात आलं आहे. असा कुठलाही मीडिया जो १६ वर्षांखालील मुलांना फोटो–व्हिडीओ अपलोड करण्याची, परस्पर संवाद साधण्याची आणि सोशल मीडियाचं व्यसन निर्माण करणारी फीचर्स वापरण्याची संधी देतो तो मीडिया मुलं वापरू शकत नाहीत. 'फ्लोरिडा बिल'नुसार असं कुठलंही प्रोफाइल जे 'मायनर' आहे, म्हणजे वयाची सोळा वर्षे पूर्ण झालेले नाही असे प्रोफाइल सोशल मीडिया कंपन्यांनी डिलीट केले पाहिजे. हे विधेयक मांडणारे टायलर सिरॉईस यांनी त्यांच्या निवेदनात म्हटले आहे की वाढीच्या मुलांचा ही माध्यमे गैरफायदा घेत आहेत. वापरणाऱ्याने खिळून राहावे असेच या माध्यमाचे बिझिनेस मॉडेलच तसे आहे.अर्थातच यावरुन उलटसुलट चर्चा सुरु झाल्या आहेत. या सगळ्यात मेटाचे म्हणणे आहे की ॲप्स डाउनलोड करण्याआधी पालकांची परवानगी हे यावर उत्तर असू शकतं. त्याचबरोबर मेटाने असंही म्हटलं आहे की जर फ्लोरिडामधल्या मुलांना सोशल मीडिया वापरण्यापासून वंचित ठेवलं गेलं तर कदाचित योग्य माहिती, नोकऱ्या, समवयीन आणि सामाजिक कार्यक्रम त्यांच्यापर्यंत पोहोचू शकणार नाही आणि हा त्यांच्यासाठी मोठा तोटा असेल.इथे सोशल मीडियाचे वापरकर्ते म्हणून आपण काही गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. सगळ्यात पहिला मुद्दा आहे सोशल मीडियाच्या बिझनेस मॉडेलचा.काय आहे सोशल मीडिया बिझिनेस मॉडेल?सगळ्यात पहिली आणि महत्वाची गोष्ट म्हणजे सोशल मीडिया किंवा कुठला ऑनलाईन प्लॅटफॉर्म आपण फुकट वापरत नाही. मेटाचे निरनिराळे प्लॅटफॉर्म्स किंवा इतरही सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स वापरण्यासाठी आपल्याकडून पैसे घेतले जात नसले तरीही आपण त्याची किंमत मोजतोच. ऑनलाईन जगात किंमत दरवेळी पैसा असेलच असं नाही. आपला डेटा, वेळ, भावनिक गुंतवणूक, त्यावरील अवलंबत्व ही सगळीच करन्सी आहे हे लक्षात घेऊया. म्हणजेच आपण कितीवेळा हे प्लॅटफॉर्म्स वापरतो यावर कंपन्यांचा फायदा तोटा अवलंबून आहे. थोडक्यात आपण पुन्हा पुन्हा या प्लॅटफॉर्म्सवर येणं अपेक्षित आहे तरच या कंपन्या चालतील आणि त्यांना नफा होईल. त्यातूनच तयार होतं व्यसनांचे मॉडेल, ज्याविषयी फ्लोरिडा बिल प्रामुख्याने नमूद करते आहे.व्यसनांची साखळी काय आहे?आपण परत परत आलो तरच ते सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्ससाठी नफ्याचे गणित आहे. म्हणजे इथे असं काहीतरी पाहिजे जेणेकरुन ग्राहकाला म्हणजे आपल्याला परत परत यावंसं वाटेल. त्यातूनच लाईक, लव्हसारखी बटणं निर्माण झाली आहेत. किती लाईक्स मिळाले याचा ट्रॅप जर नसेल तर आपण पुन्हा पुन्हा कशाला येऊ सोशल मीडियावर? आणि कॉमेंट्स हाही त्याचाच एक भाग आहे. चर्चा झाली तरच परत परत यावंसं वाटेल. इथे गणित प्रसिद्धीसारखं आहे. प्रसिद्धी चांगली की वाईट हे महत्वाचं नाही. ती होणं महत्वाचं. तसंच वापरणारे महत्वपूर्ण विषयांवर आणि दर्जेदार चर्चा करतायेत की एकमेकांना अर्वाच्य भाषेत ट्रोल करतायेत हे महत्वाचं नाही त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर 'एंगेज' राहणं आवश्यक आहे.आता हे सगळं प्रौढ व्यक्तींच्या बाबतीत कुणालाही आक्षेपार्ह वाटण्याचे कारण नाही. कारण प्रौढ व्यक्ती जे काही करतात ते विचार करुन आणि स्वेच्छेने करतात असं आपण गृहीत धरलेलं आहे. पण हेच सगळं मुलांच्या हातात जातं तेव्हा त्यांचे विपरीत परिणाम दिसायला सुरुवात होते. सायबर बुलिंगपासून बॉडी शेमिंगपर्यंत आणि सायबर गुन्ह्यांपासून डिजिटल व्यसनापर्यंत..

सोशल मीडियाचे बिझिनेस मॉडेल आणि त्यातून निर्माण होणारी व्यसनाची साखळी मुलांना कशी व्यापून टाकते, जखडून टाकते याबाबत जाणून घेऊया पुढच्या भागात.

# महिलांनो, वयाच्या तिशीनंतरही निरोगी राहायचंय? तर तुमच्या दिनचर्येत या योगासनांचा समावेश करा




घर असो किंवा ऑफिस, स्त्रिया आपली सर्व कामे आणि जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडतात. पण, ती तिच्या तब्येतीकडे दुर्लक्ष करते. असे केल्याने वजन तर वाढतेच पण त्याचबरोबर मधुमेह, हृदयाशी संबंधित समस्या, संधिवात, पाठदुखी इत्यादी आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांचा धोकाही वाढतो.म्हणूनच, आम्ही वेळोवेळी अशा योग आसनांबद्दल सांगतो, जे ती स्वतःसाठी थोडा वेळ काढून करू शकते. आज आम्ही तुम्हाला अशा योगासनांबद्दल सांगत आहोत, जे ३० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिला घरी सहज करू शकतात. प्राणायाम करा तुमच्या दिवसाची सुरुवात प्राणायामने करा. ते तुमच्या मानसिक आरोग्यासाठी चांगले आहे. मन ताजे ठेवते, चिंता कमी करते आणि सकारात्मकता वाढते. तसेच, ते फुफ्फुसांना मजबूत करते आणि कफ संबंधित समस्या दूर करते. याशिवाय दररोज असे केल्याने चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते आणि केसांचे सौंदर्य वाढते.विरभद्रासन या आसनामुळे तुमच्या मांड्या आणि खांदे मजबूत होतात. हे पोटाला आतून टोन करते. साधारणपणे हे शरीराच्या वरच्या भागासाठी फायदेशीर असते.सूर्यनमस्कार १२ योग आसनांच्या संयोगाने तयार केला जातो. हे स्नायूंना बळकट करते, रक्त प्रवाह वाढवते आणि मासिक पाळीच्या वेदनांपासून आराम देण्यास मदत करते. हे सर्व प्रमुख स्नायू, कंबर आणि हातांना टोन करते, पचनसंस्था मजबूत करते आणि शरीरातील चयापचय वाढवते.वृक्षासन वृक्षासन तुमचे पाय आणि कोर मजबूत करते आणि तुमचे नितंब आणि मांड्या टोन करते. तसेच, यामुळे चरबी कमी होते, शरीराचे संतुलन वाढते. गुडघेदुखीपासून आराम मिळतो. याशिवाय हे आसन केल्याने तणाव आणि चिंता कमी होते आणि नैराश्य दूर होते.


# तुम्हाला चाट खायला आवडते? कोणते चाट आरोग्यासाठी चांगले ते जाणून घ्या आहारतज्ज्ञांकडून.



चाट हा अनेकांच्या आवडीचा विषय आहे. लहान मुलांपासून वृद्ध लोकांपर्यंत अनेकांना चाट खायला आवडते. पाणीपुरी, शेवपुरी, रगडा पॅटिस, दही चाट, भेळ इत्यादी चाटचे प्रकार अतिशय लोकप्रिय आहेत. चाट नावाप्रमाणे जरी चटपटीत असले तरी त्यात असलेल्या कॅलरीज आणि तेलामुळे आरोग्यासाठी ते तितकेसे चांगले नसते. त्यामुळे अनेक आहारतज्ज्ञ नियमितपणे चाट आहारात घेऊ नये, असे सांगतात. त्यामुळे अनेक लोक निरोगी राहण्यासाठी चाट खाणे टाळतात. खरेच चाट आरोग्यासाठी चांगले नाही का? याविषयी आहारतज्ज्ञ पल्लवी सावंत यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना सविस्तर माहिती सांगितली. आहारतज्ज्ञ पल्लवी सावंत सांगतात, चाटमध्ये अनेकदा कडधान्ये असतात. कडधान्यांमध्ये प्रथिनांचे प्रमाण उत्तम असते. ज्या प्रदेशात तापमान कमी आहे, तिथे चाट सहसा जास्त खाल्ले जाते. कारण– कडधान्यांमध्ये असलेल्या प्रथिनांमुळे शरीराला उत्तम उष्णता अन् ऊर्जा मिळते. चाटमध्ये वापरल्या जाणाऱ्या मूग, चणे, बेसन इत्यादी पदार्थांमुळे चाट आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. काही चाटच्या प्रकारांमध्ये दहीदेखील वापरले जाते. दह्यांमध्ये असणारी प्रथिने आणि आवश्यक जीवाणू आतड्यांसाठी उत्तम असतात. त्यामुळे दही असणारे चाट आरोग्यासाठी चांगले असते. मात्र, या दह्यामध्ये जर खूप जास्त साखर घातलेली असेल किंवा गोड चटणी मिसळलेली असेल, तर ते तितकेसे पोषक ठरू शकत नाही.कोणते चाट आरोग्यासाठी चांगले नाही, याविषयी आम्ही आहार तज्ज्ञ पल्लवी सावंत यांचे मत जाणून घेतले. त्या सांगतात, चाट खाणे आरोग्यासाठी चांगले आहे की नाही हे त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांवरून ठरू शकते.पापडी आणि शेव किंवा फरसाण : जरी पापडी आणि शेव किंवा फरसाण हे पदार्थ बेसनापासून बनवले जात असले तरीदेखील ते तळण्यासाठी कोणत्या प्रकारचे तेल वापरले गेले आहे ते अनेकदा आपल्याला माहीत नसते. दररोज नियमितपणे जर तुम्ही चाट किंवा तत्सम पदार्थ खात असाल, तर शरीरातील कोलेस्ट्रॉलवर परिणाम होऊ शकतो. पाणीपुरी : पाणीपुरीतील पुरी ही कायम तळलेली असते. जरी पाणीपुरीतल्या पाण्यामध्ये पुदिना, कोथिंबीर यांसारखे अन्नघटक असतात; ज्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स चांगले असतात तरीदेखील १०० ग्रॅम पुदिना किंवा कोथिंबिरीमध्ये अँटिऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असते. तुम्ही जेव्हा पाणीपुरीतील पाण्याचे सेवन करता त्यावेळी अर्थातच त्यात पोषण मूल्यांचे प्रमाण हे अत्यल्प असते. त्याशिवाय पाणीपुरीची पुरी ही अनेकदा मैद्यापासून बनवलेली असते; ज्यामध्ये काहीही पोषणमूल्ये नसतात. त्यामुळे पाणीपुरी खाताना तुमच्या शरीरात पोषण घटकांपेक्षा कॅलरीजचे प्रमाण जास्त जात असते.रगडा पॅटिस : या पदार्थामध्ये पाव, बटाटा, तेल यांचे प्रमाण त्यात वापरल्या जाणाऱ्या कडधान्यांच्या दुप्पट असते. त्यामुळे मैद्याचे हे दुप्पट प्रमाण शरीराला अर्थातच तितकेसे उपयुक्त नसते.चाट मसाला : चाट मसाल्यामध्ये अनेकदा आमचूर पावडर, तिखट, मिरची पूड, चिंच, जिरे पूड, धणे पूड या प्रकारचे पदार्थ असतात. जे प्रमाणात खाल्ले तरच शरीरासाठी उपयोगी ठरू असतात. त्यामुळे कधीतरी चाट खाणे नक्कीच चांगले आहे; मात्र नियमित चाट खाण्याने तितकासा आरोग्याला फायदा होत नाही. त्या पुढे सांगतात, जर तुम्ही तासन् तास बसून काम करीत असाल आणि त्यात जर तुम्ही शेवपुरीमधील वापरला जाणारा बटाटा खात असाल, तर त्या बटाट्यामध्ये स्टार्च असतात, हे विसरू नये. त्याशिवाय चाट मसाल्यामध्ये रॉ मँगो पावडर असते. तसेच आमचूर पावडर, तिखट, मिरची व चिंचसुद्धा असते. चिंच ही प्रत्येक ऋतूमध्ये खाणे आरोग्यासाठी चांगले नाही. त्यामुळे कधीतरी चाट खाणे चांगले आहे; पण नियमित खाणे टाळावे.चाट खाणे पूर्णपणे बंद करावे का?अनेक लोक आरोग्याचा विचार करून चाट खाणे टाळतात. याबाबत पल्लवी सावंत सांगतात, कोणत्या प्रकारचे चाट तुम्ही खाता, त्यावर हे अवलंबून आहे. तुम्ही बटाटा, गोड चटणी एवढेच चाट खात असाल किंवा शेव असलेले चाट खात असाल, तर ते नेहमी खाणे योग्य नाही; पण तुम्ही कडधान्ये असलेले चाट खात असाल, तर ते आरोग्यासाठी अधिक चांगले आहे. त्याशिवाय चाटमधील गहू, मैदा यांचे प्रमाणसुद्धा समजून घ्यावे. त्या पुढे सांगतात, आहारतज्ज्ञ म्हणून मला स्वच्छता हा खूप महत्त्वाचा पैलू वाटतो. कारण– कोणत्याही संसर्गजन्य रोगापासून दूर राहण्यासाठी चाट तयार करण्याच्या ठिकाणी स्वच्छता असणे आणि चाट विक्रेत्यानेदेखील स्वच्छता पाळणे गरजेचे आहे. त्यामुळे चाट शक्यतो घरी बनवावे किंवा बाहेर स्वच्छ ठिकाणी खावे.

# बारामतीत सुरु होणार शासकीय नर्सिंग महाविद्यालय

अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविदयालय, आयुर्वेदीक महाविद्यालयापाठोपाठ आता बारामती शासकीय नर्सिंग महाविद्यालयही सुरु होणार आहे. बारामतीकरांसाठी ही खूषखबर आहे. राज्यमंत्रीमंडळाने बुधवारी (ता. १४) झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेतला आहे.राज्यात जळगाव, लातूर, बारामती, सांगली (मिरज), नंदुरबार , गोंदिया या सहा ठिकाणी नर्सिंग महाविद्यालय उभारण्यास राज्यमंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. या मुळे आता बारामती शासकीय नर्सिंग महाविद्यालय सुरु होणार असल्याने पॅरामेडिकल शिक्षणाचे नवीन दालन खुले होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने बारामतीत हे महाविद्यालय सुरु होण्याचा मार्ग खुला झाला आहे. गेल्या काही वर्षात बारामती मेडीकल हब म्हणून उदयास आले. येथील अहिल्यादेवी होळकर शासकीय वैदयकीय महाविद्यालय कार्यान्वित झाले असून दररोज किमान सातशे रुग्ण येथे औषधोपचार घेतात. आयुर्वेदीक महाविद्यालयाची दुसरी बँच यंदापासून बारामतीत येणार आहे. येत्या वर्षभरात ही इमारत पूर्ण करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रयत्न आहेत.बारामती पंचक्रोशीसाठी शासकीय नर्सिंग महाविद्यालय सुरु होणे महत्वाचे ठरणार आहे. कोविडपश्चात राज्यातील वैदयकीय सेवा अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने राज्यशासनाने अनेक धोरणात्मक निर्णय घेतले.त्या मध्ये राज्याच्या विविध भागात कुशल वैदयकीय मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने शासकीय नर्सिंग महाविद्यालय उभारणीचाही प्रस्ताव होता. त्या नुसार सहा ठिकाणी या महाविद्यालयांना मान्यता दिली गेली आहे. लवकरच या बाबतचा अध्यादेश जारी होऊन पुढील प्रक्रीया सुरु होणार आहे.



# मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा किनवट बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) महाराष्ट्र शासनाने २६ जानेवारी रोजी काढलेले राजपत्र अधीसुचनेचे सगेसोयरे बाबत विशेष अधिवेशन बोलावून कायद्यात रूपांतर करण्याविषयी सगेसोयऱ्यांच्या संदर्भात अधिक स्पष्टता कधी आणणार? सरकारवर अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती करत मनोज जरांगे पाटील यांनी शनिवार (ता.१०) पासून आपल्या आमरण उपोषणाला सुरुवात केली. आरक्षण हे मराठा समाजाच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्यामुळे आता मराठ्यांशी दगाफटका करू नका,तत्काळ आरक्षण संदर्भातील कारवाही करावी यासह अन्य मागण्यासाठी उपोषण सुरू केले आहे. उपोषणाला पाठिंबा म्हणून किनवट तालुका १५ फेब्रुवारी रोजी कडकडीत बंद ठेवण्यात आला आहे. शहरातील बाजारपेठ सकाळपासून कडकडीत बंद करण्यात आली असून, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थितीवर देखील या बंदचा परिणाम झाला आहे.सकल मराठा समाजाच्या वतीने हा बंद पाळण्यात आला आहे. किनवट तालुक्याच्या वतीने मराठा योद्धा मनोज जरांगे–पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शवण्यासाठी हा बंद पाळण्यात आला असून, बुधवारी याबद्दलची माहिती देण्यात आली होती. आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे– पाटील यांनी





आंतरवाली सराटी येथे पुन्हा एकदा उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने किनवट शहर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जागोजागी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तालुक्यातील अत्यावश्यक सेवा वगळून सर्व व्यापारी बांधवांनी या बंदमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले होते. आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून आपल्या बंदमध्ये सहभाग नोंदवावा व आपल्या तालुक्याचे परंपरेनुसार शांततामय मार्गाने हा बंद सर्वांनी यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आजचा सहावा दिवस आहे.त्यांची प्रकृती खालावल्याने किनवट तालुक्यातील मराठा समाज भावनिक मोडवर आहे. बुधवारी दिवसभर सकल मराठा समाजाने शोशल मीडियावर पोस्ट टाकून पाठिंबा म्हणून किनवट तालुका बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याला पाठिंबा देत शहरातील व्यापाऱ्यांनी बंदला उत्स्फूर्त पाठिंबा देत कडकडीत बंद पाळला.मराठा आरक्षणाच्या संदर्भात मनोज जरांगे यांनी आंतरवाली सराटी येथे पुन्हा आमरण उपोषणाला सुरुवात केली. कुणबी नोंदी, प्रमाणपत्र तसेच सगेसोयऱ्यांच्या संदर्भातील अध्यादेश यावरून सरकारवर टीकेची झोड उठवली. राष्ट्रपती राजवटीचा निर्णय पहाटे बदलतो, मग मराठा आरक्षणाच्या निर्णयालाच का वेळ लागतो, असा सवालही उपस्थित केला आहे.

## अंधविद्यालयात अंध विद्यार्थ्यावर शिक्षकाकडून लैंगिक अत्याचार ग्रामस्थांनची कठोर कार्यवाहीची मागणी:

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) किनवट तालुक्यातील बोधडी बु. येथील अंध विद्यालयातील एका अकरा वर्षीय अंध विद्याथ्यर्थ्यांवर या शाळेतील सहशिक्षक दत्ता आंकमवार राहणार बोधडी व माजी विद्यार्थी हनुमान झाडे रा. कृष्णापूर ता. हदगाव यांनी या अंध विद्यालयाच्या वस्तीगृहात राहणाऱ्या अल्पवयीन अंध विद्यार्थ्यांवर नैसर्गिक अत्याचार केल्याप्रकरणी सदर विद्यार्थ्यांचे वडील शेख मझहर पिता शेख हुसेन राहणार वाजेगाव नांदेड यांनी किनवट पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरून भारतीय दंड संहिता बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम कलम ३७७,४ (२) ६, ९ (फ) १२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे व शिक्षक दत्ता आंकमवार यास अटक करण्यात आली आहे. याबाबत वृत्त असे की बोधडी बु. येथील अंध विद्यालयात शिकणाऱ्या अकरा वर्षीय अंध विद्यार्थी रात्रीच्या वेळी वस्तीगृहात माजी विद्यार्थी असलेला हदगाव झोपला असताना रात्री एकच्या सुमारास दत्ता आंकमवार हा शिक्षक या विद्यार्थ्यांच्या बाजूला गादीवर झोपून त्याने त्याची चड्डी काढून लैंगिक अत्याचार केला आणि त्यानंतर पुन्हा तीन वाजता या शाळेत तालुक्यातील कृष्णापुर येथील माझी अंध विद्यार्थी हनुमान झाडे याच शाळेत काही कामानिमित्त थांबला असताना त्यांनीही या बालकावर लैंगिक अत्याचार के ला घाबरलेल्या या बालकांनी सकाळी भ्रमणध्वनीवरून आपल्या वडिलास हा प्रकार सांगितला



त्यानंतर यांनी बोधडी येथील अंधशाळेत येऊन संबंधित गृहपाल आणि इतर कर्मचा–यांना जाब विचारला पण सर्वांनीच उडवा उडवीची उत्तरे दिली एवढा गंभीर प्रकार घडल्यानंतरही संस्थेच्या अध्यक्षास त्याची कल्पनाच नव्हती अन्यायग्रस्त अंध बालकाला घेऊन सदर मुलाच्या वडिलांनी आणि नातेवाईकांनी किनवट पोलीस स्टेशन गाठले आणि याबाबतची तक्रार दिल्यावर वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकेकाळी महाराष्ट्रात नावाने गाजलेल्या या अंध विद्यालयात असा घृणास्पद प्रकार घडल्याने बोधडी गावात संतापाची लाट पसरली असून या शाळेची संबंध नसलेल्या माजी विद्यार्थ्यांला या शाळेत रात्री झोपण्याची परवानगी दिलीच कशी या सर्व प्रकाराची चौकशी करण्याची मागणी ही ग्रामस्थांनी केली असून दुस–याही आरोपीला तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी ही बोधडी ग्रामस्थांनी केली आहे. या शाळेत या अंधशाळेचे प्रशासन ढेपाळले असून संस्थाचालकाचे नियंत्रणच नसल्याने हा धक्कादायक प्रकार घडला असल्याचा आरोप ही सदर मुलाच्या पालकाने केला आहे पुढील तपास पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रेय मामीडवार करीत आहेत.

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, ४ मोटरसायकल जप्त. ०१आरोपी अटक

लातूर :– स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, ४ मोटरसायकल जप्त. ०१आरोपी अटक या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक १४/०२/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील दोन गुन्हेगार चोरलेली मोटरसायकल विकण्यासाठी बाभळगाव चौक परिसरात फिरत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने दिनांक १४/०२/२०२४ रोजी सदर पथक तात्काळ बाभळगाव चौक परिसरात पोचून रोडवर मोटार सायकलसह थांबलेल्या इसमाला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव मोईन अकबर चौधरी, वय २२ वर्ष, राहणार चिल्ले कॉम्प्लेक्स जवळ, शास्त्रीनगर लातूर. असे असल्याचे सांगितले.




तसेच त्यांच्या ताब्यात असलेल्या वाहना संदर्भाने विचारपूस केली असता सांगितले कि, सदरची मोटरसायकल काही महिन्यापूर्वी बाभळगाव रोड वरील एका पेट्रोल पंपा समोरून मी व एक अल्पवयीन बालक असे दोघे मिळून चोरी केलेली आहे. तसेच आरोपी नामे अखिल महबूब शेख, राहणार परळी जिल्हा बीड. याने कोठून तरी चोरून आणलेल्या आणखीन तीन मोटारसायकली विकण्यासाठी आमच्याकडे दिलेल्या असल्याचे सांगितले व ते काढून दिल्याने त्या मोटरसायकली नमूद आरोपीकडून जप्त केले आहे.

नमूद आरोपीकडून चोरीच्या मोटारसायकली ज्याची एकूण किंमत २ लाख ५० हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

पोलीस ठाणे विवेकानंद चौक तसेच पोलीस ठाणे बीड शहर येथील प्रत्येकी एक असे एकूण दोन मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

नमूद आरोपीला पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे पुढील कार्यवाहीस्तव ताब्यात देण्यात आले असून संबंधित पोलीस ठाणेचे पोलीस पुढील तपास करीत आहेत. बीड येथील आरोपीचा शोध सुरू आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात पोलीस अंमलदार नितीन कटारे, राहुल सोनकांबळे, साहेबराव हाके, राजेश कंचे, मनोज खोसे, राहुल कांबळे यांनी पार पाडली.

## मुंबईतील कायम रहिवाशी असलेल्या दिव्यांगाना मिळणार अर्थसहाय्य. पालिकेची प्रस्तावला अखेर मंजुरी.

अर्थ सहाय्य देण्याची गरज का भासते.
दिव्यांगांना २१ प्रकारांना केंद्र शासनाने मान्यता दिली आहे यामध्ये बरेच दिव्यांगाना विविध समस्यांचा सामना करावा लागतो. अंध दिव्यांग, कुष्ठरोगातून बरा झालेला दिव्यांग, बौद्धिक अक्षमता दिव्यांग मानसिक विकलांगता दिव्यांग आटीजम सरेब्रल,मस्क्युलर, डीस्टाफी. थैलेसिमिया हीमोफीलीया असे विविध दिव्यांग तसेच शिक्षण पूर्ण न करणाऱ्या शकणारे असे विविध दिव्यांग मोडतात.

मुंबई / शहामत शेख. मुंबईतील कायम रहिवासी असलेल्या दिव्यांगाना महापालिकेच्या वतीने अर्थसहाय्या देणार असल्याची घोषणा महापालिका आयुक्त तथा प्रशासक इकबाल सिंह चहल यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात दरम्यान केली. त्यानंतर प्रस्तावालाच प्रशासकांनी मंजुरी दिली. त्यामुळे येत्या १एप्रिल २०२४ याचे प्रत्यक्षात अंमलबजावणी होणार आहे. त्यामुळे मुंबई स्थायिक असलेल्या ४० ते ८० टक्के दिव्यांग व्यक्तीला वर्षाला १२ हजार रुपये ८० टक्के वरील दिव्यांगाला ३६००० याप्रमाणे अर्थसहाय्य दिले जाणार आहे. हे अर्थसहाय्य सहसंवेदना या योजनेअंतर्गत दिले जाणार होते. परंतु

बॉक्स. दिव्यांगाच्या तीव्रतेनुसार अशाप्रकारे याप्रकारे दिले जाणारी यूआयडी कार्ड. सफेद कार्ड – दिव्यांगतत्व ४० % कमी असेल तर. पिवळे कार्ड– दिव्यांगतत्व ४०% अधिक असेल तर . निळे कार्ड – दिव्यांगतत्व हे ८०%पेक्षा अधिक असेल तर. कोणत्या दिव्यांगाना कसे मिळणार अर्थसहाय्य. कार्डचा प्रकार – पिवळे कार्ड धारक –दिव्यांगाची टक्केवारी– ४० ते ८० टक्के.दिव्यांगाची यूआयडी धारकांची संख्या – ४२०७८ .अर्थसहाय्य प्रत्येक सहा महिन्यांनी ६०००रुपये. वर्षाला १२ हजार रुपये . निळे कार्डधारक. दिव्यांगाची यूआयडी कार्ड धारकांची संख्या –१७०३४ अर्थसहाय्य– प्रत्येक सहा महिन्यांनी १२ हजार रुपये वर्षाला ३६ हजार रुपये प्रत्येकी याप्रमाणे.



त्याचे नाव पुढे धर्मवीर आनंद दिघे दिव्यांग अर्थसहाय्य योजना असे करण्यात आले. अपंग व्यक्तींना अर्थसाह्य देण्याबाबत वारंवार दिव्यांग व्यक्ती,प्रहार अपंग क्रांती संस्था, महाराष्ट्र अपंग संचलित टेलिफोन टेलिफोन बूथ संघटना. मानव विकास संस्था यांच्याकडूनअपंग व्यक्तींना पेन्शन सुरू करावी करावी अशी मागणी होत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी या अभियाना अंतर्गत दिव्यांग राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष तथा मुख्य मार्गदर्शक माजी राज्यमंत्री आमदार बच्चू कडू आणि ३० मे २०२३मे तथा १ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिव्यांगाना अर्थसहाय्य योजना निर्देश दिले. यामुळे अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची मदत होईल अशी सूचना केली होती. त्यानुसार महापालिका बजेट अंतर्गत ही योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## कायदे मोडून काम सुरु, नार्वेकरांकडून काय अपेक्षा करणार : सुप्रिया सुळे

मुंबई : राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रतेवर विधानसभा अध्यक्षांनी आज निकाल जाहीर केला. बहुमताला महत्व देत राहुल नार्वे कर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवारांचा असल्याचे सांगितले. तसेच पक्षात मतभेद असतात, ते अंतर्गत सोडवायचे असतात असे सांगत दोन्ही बाजुचे आमदार अपात्र नाहीत, असा निर्णय दिला आहे. याचबरोबर शरद पवार गटाच्या तीन याचिका फेटाळल्या.यावर सुप्रिया सुळे यांचा प्रतिक्रिया आली आहे.त्या म्हणाल्या, हा कॉपी पेस्ट निकाल आहे. शिवसेनेचे नाव बदलून राष्ट्रवादीचे दिले आहे. स्थानिक पक्षांची गळचेपी सुरु आहे. भाजपाला



कोणताही स्थानिक पक्ष मोठा होताना पहावत नाही. यामुळे आयकर, सीबीआय, ईडीला मागे लावायचे आणि गळचेपी करायची हा प्रकार सुरु आहे, असा आरोप राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला.अदृष्य शक्तीच्या आदेशावरून निकाल देण्यात आला आहे. कायदे नियम, संविधान मोडून काम सुरु आहे. राहुल नार्वे करांकडून काय अपेक्षा करणार, असा आरोप सुळे यांनी केला आहे. मी निकाल वाचन पाहिले नाही. कारण शिवसेनेवेळी पाहिले होते. यामुळे मला हे अपेक्षितच होते, असेही सुळे म्हणाल्या.

## नवाझ शरीफ पंतप्रधानपदापासून दूर राहणार

इस्लामाबाद : पाकिस्तानात निवडणुका पार पडल्या असून त्यात कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. अशा वेळी इम्रान खान विरूद्ध नवाझ शरीफ असा सामना असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. गेल्या वर्षी नवाझ शरीफ लंडनहून पाकिस्तानात परतले तेव्हा ते केवळ पंतप्रधान होण्यासाठी परतले होते असे सांगण्यात आले होते. त्यांच्यावर सुरु असलेले खटलेही संपले होते आणि त्याला लष्कराचा पाठिंबाही मिळाला. एवढे सगळे होऊनही त्यांच्या पक्षाला निवडणुकीत बहुमत मिळू शकले नाही. बहुमतापासून दूर असूनही नवाझ शरीफ यांचा पीएमएल–एन सरकार स्थापन करणार असल्याचा दावा करत आहे. मात्र ते स्वत: पंतप्रधान होत नाहीत. त्यांनी त्यांचे भाऊ शाहबाज शरीफ यांना पंतप्रधान करण्याचा निर्णय घेतला आहे नवाझ शरीफ यांना पंतप्रधानपदी पाहायचे आहे असे शाहबाज यांनी जाहीरपणे सांगितले होते, पण नवाझ यांनी हे पद न घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच्या या निर्णयामागे दोन प्रमुख कारणे आहेत. नवाझ शरीफ पंतप्रधान न होण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचा पक्ष बहुमतापासून दूर आहे. निवडणुकीच्या निकालानंतर त्यांनीही आपल्याला बहुमताची अपेक्षा



असल्याचे सांगितले. दुसरीकडे, त्यांनी निकालापूर्वीच आघाडी सरकार न चालवण्याची इच्छा व्यक्त केली होती. निवडणुकीच्या दिवशी मतदान केल्यानंतर त्यांनी पत्रकारांना सांगितले होते की, कठोर निर्णय घेऊन आणि दिलेली आश्वासने पूर्ण करण्याची जबाबदारी घेऊन बहुमत असलेले सरकारच देशाला सध्याच्या संकटातून बाहेर काढू शकते. अशा परिस्थितीत बहुमत न मिळाल्याने त्यांनी पंतप्रधानपदापासून दूर राहण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE